आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर
वाचा एका क्लिकवर
www.dainiklaturprabhat.in




दैनिक लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com

मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,

RNI No.: - MAHMAR/2017/72894 ● वर्ष ८ वे ● अंक ६६ वा ● बुधवार दि. ३१ जुलै २०२४ ● किंमत २ रूपया ● पाने ४ ●

### मनू भाकर आणि सरबज्योत सिंग यांचे अचूक 'लक्ष्यभेद' पॅरिस ऑलिम्पिकमध्ये देशाला दुसरे कांस्यपदक – क्रीडा मंत्री संजय बनसोडे यांच्याकडून अभिनंदन

मुंबई, : नेमबाज मनू भाकर आणि सरबज्योत सिंग या दोघांनी अचूक लक्ष्यभेद करत भारताला नेमबाजीत आणखी एक कांस्य पदक मिळवून दिले. विशेष म्हणजे मनू भाकरचे हे ऑलिम्पिकमधील दुसरे पदक आहे. एकाच ऑलिम्पिकमध्ये दोन पदके पटकवणारी ती देशातील पहिली महिला खेळाडू ठरली आहे. देशवासीयांना त्यांचा सार्थ अभिमान आहे, असे गौरवोद्गार क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री संजय बनसोडे यांनी काढले. फ्रान्सची राजधानी पॅरिस येथे सुरू असलेल्या ऑलिम्पिक स्पर्धेत भारताची नेमबाज मनू भाकर आणि सरबज्योत सिंग या जोडीने १० मीटर एअर पिस्तुल मिश्र सांघिक प्रकारात देशाला दुसरे ऑलिम्पिक कांस्य पदक जिंकून दिले, त्याबद्दल मंत्री श्री. बनसोडे यांनी अभिनंदन केले. तसेच भारतीय खेळाडू पॅरिस ऑलिम्पिंकमध्ये अधिकाधिक पदके जिंकतील आणि त्यात महाराष्ट्राचा वाटा मोठा असेल, असा विश्र्वास मंत्री श्री. बनसोडे यांनी व्यक्त केला.

## महसूल सप्ताह अंतर्गत १ ऑगस्टपासून विविध उपक्रमांचे आयोजन

लातूर : महसूल विभागामार्फत १ ते ७ ऑगस्ट या कालावधीत महसूल सप्ताह साजरा करण्यात येणार आहे. यामध्ये शासनाच्या पथदर्शी व अभिनव योजनांचा प्रचार, प्रसार व अंमलबजावणी ही या सप्ताहाची वैशिष्ट्ये असणार आहे.

महसूल सप्ताहामध्ये प्रत्येक दिवशी महसूल विभागामार्फत समाजाच्या विविध घटकातील नागरिकांसाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार आहे. यामध्ये १ ऑगस्टला महसूल सप्ताहास सुरवात होणार असून यादिवशी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, २ ऑगस्टला मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना, ३ ऑगस्टला मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना, ४ ऑगस्टला स्वच्छ व सुंदर माझे कार्यालय, ५ ऑगस्टला सैनिक हो तुमच्यासाठी, ६ ऑगस्ट रोजी एक हात मदतीचा दिव्यांगाच्या कल्याणाचा, तर ७ ऑगस्ट रोजी महसूल संवर्गातील कार्यरत सेवानिवृत्त अधिकारी कर्मचारी संवाद, उत्कृष्ट अधिकारी कर्मचारी पुरस्कार वितरण व महसूल सप्ताह सांगता समारंभ घेण्यात येणार आहे.

### काँग्रेसचे ज्येष्ठ नेते माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांनी घेतली माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांची भेट विविध विषयावर केली चर्चा

लातूर प्रतिनिधी : काँग्रेसचे ज्येष्ठ नेते माजी



मंत्री मधुकरराव चव्हाण यांनी राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांची मंगळवार दि. ३० जुलै रोजी सकाळी बाभळगाव निवासस्थानी भेट घेऊन विविध विषयावर चर्चा केली.

यावेळी मुकुंददादा डोंगरे, प्रकाश चव्हाण, अशोक कदम, विलास सहकारी साखर कारखाण्याचे व्हा.चेअरमन रवींद्र काळे, दिलीप सोमवंशी, ऋषिकेश मगर, भालचंद्र मगर, ढवळे, रशीद बुलंगे, शिवाजी गायकवाड, बालाजी बंडगर आदी उपस्थित होते.

### 'नाबार्ड'च्या अर्थसहाय्याने होणाऱ्या कामांसाठी जलसंपदा विभागाने मिशन मोडवर काम करावे – उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई :– 'नाबार्ड'च्या अर्थसहाय्याने जलसंपदा विभागाकडील अपूर्ण प्रकल्पांची कामे करण्यात येणार असून या प्रकल्पांच्या कामाचा प्रारंभ करण्यासाठी जलसंपदा विभागाने मिशन मोडवर काम करावे, अशा सूचना उपमुख्यमंत्री तथा जलसंपदा मंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या.

नाबार्डच्या अर्थसहाय्याने कार्यान्वित असलेल्या जलसंपदा विभागाकडील प्रकल्पांचा आढावा उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी घेतला. बैठकीस महसूल मंत्री राधाकृष्ण विखे–पाटील, 'मित्रा'चे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीणसिंह परदेशी, जलसंपदा विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव डॉ. दीपक कपूर, वित्त विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव ओ.पी. गुप्ता, उपमुख्यमंत्री यांचे सचिव डॉ. श्रीकर परदेशी, वित्त विभागाच्या सचिव शैला ए., जलसंपदा विभागाचे सचिव संजय बेलसरे, 'नाबार्ड'च्या महाव्यवस्थापक श्रीमती रश्मी दराड यांच्यासह जलसंपदा विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले की, राज्यातील सिंचन क्षमता वाढण्यासाठी जलसंपदा विभागाकडील अपूर्ण प्रकल्प पूर्ण करण्यास नाबार्डचे अर्थसहाय्य घेण्यात येत आहे. हे अर्थसहाय्य तातडीने उपलब्ध होण्यासाठी नाबार्डला आवश्यक माहिती जलसंपदा विभागाने तातडीने पुरवावी. वित्त विभागानेही यासाठी आवश्यक असणारी मंजुरी द्यावी.




# लातूर विमानतळाचा ताबा खासगी कंपनीकडून काढून महाराष्ट्र विमानतळ विकास महामंडळाकडे देण्याचा निर्णय

**लातूर – लातूर विमानतळ प्राधिकरणाने विमानतळ देखभाल, दुरुस्ती व विकासासाठी एका खासगी कंपनीसोबत करार केलेला होता पण सदरील कंपनीने करारानुसार काहीच काम केले नसल्यामुळे लातूर विमानतळाचा खासगी कंपनीसोबतचा करार रद्द करावा अशी मागणी आ अभिमन्यू पवार यांनी १४ ऑगस्ट, २०२२ रोजी सभागृहात केली होती. त्यानंतरही या विषयाचा सातत्यपूर्ण पाठपुरावा केला होता.याबाबत उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत लातूर विमानतळाचा ताबा खासगी कंपनीकडून काढून महाराष्ट्र विमानतळ विकास महामंडळाकडे देण्याचा निर्णय झाला आहे.**

उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या अध्यक्षतेखाली (दि २८) जुलै रोजी उद्योग विभागाची ४०० वी बोर्ड मीटिंग संपन्न झाली. या बैठकीत लातूर विमानतळाचा ताबा खासगी कंपनीकडून काढून महाराष्ट्र विमानतळ विकास महामंडळाकडे देण्याचा निर्णय झाला. आता लातूर विमानतळ धावपट्टीची लांबी वाढवण्यासह इतर रखडलेली कामे मार्गी लावून विमानतळ



कार्यान्वित करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. लातूर विमानतळाचा खाजगी कंपनीसोबतचा करार रद्द करावा तसेच लातूर विमानतळावरून विमानसेवा सुरु करण्यासंदर्भात कार्यवाही करण्याची विनंती आ अभिमन्यू पवार यांनी उद्योग मंत्री उदय सामंत यांना २२ डिसेंबर २०२२ रोजी केली होती. त्यांनी लातूर विमानतळाची पाहणी करून वस्तुनिष्ठ अहवाल सादर करण्याच्या लातूर विमानतळावरून विमानसेवा सुरु करण्यासाठी आवश्यक असलेली सर्व कार्यवाही जलद गतीने पूर्ण करण्याच्या सूचना संबंधितांना दिल्या होत्या.याबाबत आ अभिमन्यू पवार यांनी याबाबत सातत्याने पाठपुरावा सुरू ठेवला होता दरम्यान उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या अध्यक्षतेखाली २८ जुलै रोजी उद्योग विभागाची ४०० वी बोर्ड मीटिंग संपन्न झाली. या बैठकीत लातूर विमानतळाचा ताबा खासगी कंपनीकडून काढून महाराष्ट्र विमानतळ विकास महामंडळाकडे देण्याचा निर्णय झाला.आ अभिमन्यू पवार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हा विषय मार्गी लागला असून याबाबत आ अभिमन्यू पवार यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उद्योग मंत्री उदय सामंत व लातूरचे पालकमंत्री गिरीश महाजन यांचे आभार मानले आहेत.

# डॉ.शिवाजी काळगे यांच्या खासदारकीला खंडपीठात आव्हान,पत्रकार परिषदेतील माहिती

लातूर, : बोगस,बनावट कागदपत्राआधारे माला जंगम जात,आणि जातवैधता प्रमाणपत्र मिळवून,लातूर राखीव(अ.जा.) लोकसभा मतदार संघातील नवनिर्वाचित खासदार डॉ. शिवाजी काळगे यांच्या खासदारकीला मुंबई उच्च न्यायालयाच्या छ.संभाजी नगर खंडपीठात आव्हान देण्यात आले असून, या याचिका क्र.०६/२०२४ ची पुढील सुनावणी दि.६ ऑगस्ट २०२४ रोजी होणार असल्याची माहिती याचिकाकर्ते उमेदवार प्रा.विश्वनाथ आल्टे,दत्तू नरसिंगे, ॲड.भारत ननवरे,ॲड.प्रविण जोहारे आणि जागरूक नागरिक विठ्ठल भोसले यांनी आज दि.३० जुलै २०२४ रोजी पत्रकार परिषदेत दिली.

विस्ताराने माहिती देताना त्यांनी सांगितले की, डॉ.शिवाजी बंडाप्पा काळगे यांचे मुळगाव अंकुलगा राणी ,ता.निलंगा असून,सध्या ते लातूरच्या नेताजी नगरात वास्तव्यास आहेत. त्यांच्या निवासस्थानीच भव्य डोळ्याचा दवाखाना आहे. त्यांचा जिल्हा परिषद प्रशाला अंकुलगा (राणी) येथे शाळेतील ईयत्ता पाहिलीतील प्रवेश दि.१२ जून १९७४ रोजीचा असून,त्यांचा प्रवेश निर्गम उतार्यावर जातीचा उल्लेख हिंदु ( जंगम माला) असा आहे. तसेच डॉ.शिवाजी काळगे यांची सख्खी बहिण लता बंडाप्पा काळगे यांचा ईयत्ता सातवीच्या शाळा सोडल्याच्या दाखल्या(टी.सी.)वर जातीचा उल्लेख स्पष्टपणे हिंदू (जंगम) असा आहे. तसेच त्यांची सख्खी चुलत बहिण निर्मला काशिनाथप्पा काळगे यांचा जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, अंकुलगा (राणी) शाळेच्या जनरल रजिस्टरला जातीचा उल्लेख लिंगायत (जंगम) असा आहे. यावरुन डॉ.शिवाजी काळगे यांच्या व त्यांचे रक्ताचे नातेवाईक जसे बहिण व चुलत बहिण यांच्या जातीच्या उल्लेखामध्ये तफावत दिसून येते. तसेच गाव नमुना नं.१३ मध्ये अनु.क्र.११६ वर जातीचा रकाना नसताना डॉ.शिवाजी बंडाप्पा काळगे यांचे वडील बंडाप्पा मालिंगप्पा यांच्या नावासमोर माला जंगम असे नंतर वाढविल्याचे दिसून येते कारण बंडाप्पाचे ईतर भावांच्या नावासमोर जातीचा उल्लेख



दिसून येत नाही. यावरुन हे सिध्द होते की, डॉ.शिवाजी बंडाप्पा काळगे यांनी माला जंगम जातीचे खोटे व बनावट जात प्रमाणपत्र काढले आहे. शैक्षणिक, नोकरी आणि राजकीय फायदा घेतला आहे.

डॉ.शिवाजी बंडाप्पा काळगे यांनी दि.१४ जुलै १९८६ रोजी तहसील कार्यालय निलंगा येथून माला जंगम या जातीचे प्रमाणपत्र काढले. त्यांनी ईयत्ता १२ वी (विज्ञान) उत्तीर्ण झाल्यानंतर सन १९८६ मध्ये जातपडताळणी समिती,पुणे यांच्याकडे जात पडताळणीकरिता प्रस्ताव दाखल केला होता.सदरील समितीने त्यांचा माला जंगम जातीचा प्रस्ताव अवैध ठरविला होता. त्यानंतर त्यांनी विभागीय आयुक्त,औरंगाबाद यांचेकडे अपिल क्र.१९८७ मध्ये दाखल केले होते. त्याचा निकाल डॉ. शिवाजी काळगे यांचे जात प्रमाणपत्र वैध असल्याचा निर्णय दिला होता.त्यानंतर काहीही कारण नसताना डॉ.शिवाजी काळगे यांनी स्वतः औरंगाबाद उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. सदर याचिका उच्च न्यायालयाने सन २००१ मध्ये मंजूर के केली असून, सदर निर्णयामध्ये जात वैधतेला आव्हान देण्याचा मुद्दा खुला ठेवला अहो.त्यामुळे सदरील जात वैधता बाबतचा निर्णय हा कायमस्वरुपी नाही हे दिसून येते असे ते म्हणाले.

डॉ.शिवाजी बंडाप्पा काळगे यांनी शिरुर अनंतपाळ तहसीलदार यांच्याकडे नव्याने अर्ज करुन माला जंगम जातीचे प्रमाणपत्र दि.१३ मार्च २०१४ रोजी प्राप्त केले आहे. सन २०१६ साली डॉ. शिवाजी काळगे यांनी त्यांची मुलगी श्रेया शिवाजी काळगे हिचे जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी करुन घेतले.त्यानंतर त्यांनी स्वतःची जात वैधता सन २०१९ मध्ये वयाच्या ४९ व्या वर्षी करुन घेतली. दरम्यानच्या डॉ.डॉ.शिवाजी काळगे यांनी वैद्यकीय शिक्षण घेतले तसेच वैद्यकीय अधिकारी म्हणून नेमणूक दि.१ सप्टेंबर २०१८ पासून दिली असताना त्याच कार्यालयामार्फत सेवेत रुजू होण्याच्या अगोदर म्हणजे दि.२३ ऑगस्ट २०१८ रोजीच जात वैधता पडताळणीचा संबंधित समितीकडे प्रस्ताव पाठविला आहे,जो बेकायदेशीर आहे,असा आरोप यावेळी करण्यात आला.

एकूणच डॉ.शिवाजी बंडाप्पा काळगे यांनी खोटे जात प्रमाणपत्र काढून त्याची जात वैधता बेकायदेशीररित्या करुन घेतली असून, अनुसूचीत जातीच्या वर्गाला मिळणारे सर्व लाभ घेतले आणि एका अनुसूचीत जातीच्या वर्गाच्या व्यक्तीचा हक्क हिरावून घेतला आहे, जो कायद्याने गुन्हा आहे.म्हणून आम्ही याचिकाकर्त्यांनी न्याय्य हक्कासाठी निवडणूक याचिका छत्रपती संभाजी नगर खंडपीठात दाखल केली आहे असे सांगून याचा निकाल लवकरात लवकर लागेल अशी अपेक्षा याचिकाकर्ते उमेदवार प्रा.विश्वनाथ आल्टे,दत्तू नरसिंगे, ॲड.भारत ननवरे,ॲड.प्रविण जोहारे आणि जागरुक नागरिक विठ्ठल भोसले यांनी यावेळी व्यक्त केली.

# १ ऑगस्टपासून महसूल पंधरवड्याचे आयोजन

मुंबई :– महसूल विभागाकडून दरवर्षी महसूल दिन आणि महसूल सप्ताहाचे आयोजन केले जाते. यात या वर्षी महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी बदल करून महसूल पंधरवडा साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे आता १ ते १५ ऑगस्ट पर्यंत महसूल पंधरवडा साजरा केला जाणार आहे.

या १५ दिवसांत महसूल विभागाच्या वतीने विविध उपक्रम राबवून महसूल विभागाच्या विविध योजना आणि सेवा सुविधांची माहिती जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत पोहोचावी आणि लोकांमध्ये महसूल विभागाबद्दल अधिक विश्र्वास निर्माण व्हावा यासाठी या उपक्रमाचे आयोजन करण्यात आल्याचे मंत्री श्री.विखे पाटील यांनी व्यक्त सांगितले.

महसूल विभागाकडून देण्यात येणाऱ्या सेवा सुविधांची नागरिकांना अधिक माहिती मिळावी आणि त्यांची कामे जलद आणि सुलभ व्हावीत यासाठी महसूल पंधरवड्यात १ ते १५ ऑगस्ट या कालावधीत विविध उपक्रम राबविले जाणार असून नागरिकांना त्याचा मोठा लाभ होणार आहे. १ ऑगस्ट रोजी महसूल दिन साजरा करून महसूल सप्ताहाचा शुभारंभ केला जाईल. या दिवशी 'मुख्यमंत्री –माझी लाडकी बहीण' योजनेसाठी अर्जदारांना लागणारी सर्व कागदपत्रे दिली जातील. २ ऑगस्ट रोजी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना, ३ ऑगस्ट रोजी मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना , ४ ऑगस्ट रोजी स्वच्छ व सुंदर माझे कार्यालय, ५ ऑगस्ट रोजी कृषी मार्गदर्शन कार्यक्रम, ६ ऑगस्ट रोजी शेती, पाऊस आणि दाखले उपक्रम राबविला जाणार आहे. या उपक्रमात पूर्व मॉन्सून व मॉन्सून कालावधीत अवकाळी पाऊस, अतिवृष्टी, पूर यामुळे बाधित झालेल्या नागरिकांच्या घरांचे, शेती, फळबागा, जनावरांचे झालेल्या नुकसानीबाबत आढावा घेऊन विविध दाखले वाटप केले जाईल, ७ ऑगस्ट रोजी युवा संवाद उपक्रमाच्या अनुषंगाने शालेय शिक्षण आणि रोजगाराच्या अनुषंगाने विविध दाखल्यांचे वाटप केले जाणार आहे. ८ ऑगस्ट रोजी महसूल जनसंवाद उपक्रमाच्या अंतर्गत महसूल विभागातील विविध प्रकरणे, अपील, सलोखा योजनेतील प्रकरणे, जमिनीविषयक खटले निकाली काढली जातील. ९ ऑगस्ट रोजी महसूल **(पान ४ वर)...**

## जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.निळकंठ भोसीकर यांची ग्रामीण रुग्णालय भोकर येथे भेट व पाहणी

भोकर– नांदेड जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.निळकंठ



भोसीकर यांची आज ग्रामीण रुग्णालय भोकर भेट दिली व विविध विभागाची पाहणी केली. रूग्णांना योग्य वेळेत उपचार व सुविधा देण्यात यावा. सर्व वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांची बैठक घेऊन कामाचा आढावा घेतला व सूचना दिल्या.

यावेळी भोकर ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ प्रताप चव्हाण, डॉ मोहिनी पाटील, डॉ अनंत चव्हाण, डॉ नितीन कळसकर, डॉ बाळासाहेब बिराडे, डॉ सारिका जावळीकर, डॉ. शिल्पा कळसकर, डॉ सविता कांबळे, डॉ मायादेवी नरवाडे, सत्यजीत टिप्रेसवार, गंगामोहन शिंदे, मनोज पांचाळ, संजय देशमुख, प्रल्हाद होळगे,बालाजी चांडोळकर, मल्हार मोरे, प्रकाश सर्जे आदी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांचा दौरा

लातूर : राज्याच्या क्रीडा व युवक कल्याण, बंदरे विभागाचे मंत्री संजय बनसोडे हे बुधवार, ३१ जुलै २०२४ रोजी लातूर जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.

क्रीडा व युवक कल्याण मंत्री ना. बनसोडे यांचे ३१ जुलै रोजी सकाळी ६.३० वाजता लातूर येथे आगमन होईल व शकुंतला निवासस्थान येथे राखीव. सकाळी ९.३० वाजता लातूर येथून मोटारीने बिदर जिल्ह्यातील भालकीकडे प्रयाण करतील. सकाळी ११.३१ वाजता भालकी येथील सन्मुखअप्पा कल्याण मंडप येथे रामेश्र्वर प्रभूअप्पा निटूरे यांच्या मुलाच्या विवाह सोहळ्यास उपस्थित राहतील. दुपारी १२.१५ वाजता भालकी येथून जळकोटकडे प्रयाण करतील. दुपारी २ वाजता जळकोट येथील श्री गुरुदत्त माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय येथे आयोजित पूज्य कुमार स्वामी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य चंद्रकांत मारुती कांबळे यांच्या सेवानिवृत्ती सोहळ्यास उपस्थित राहतील. दुपारी ४ वाजता जळकोट येथून मोटारीने उदगीरकडे प्रयाण करतील.

ना. बनसोडे हे सायंकाळी ५ वाजता उदगीर तालुक्यातील नागलगाव येथील श्री बाबुराव पांचाळ यांच्या निवासस्थानी सांत्वनपर भेट देतील. सायंकाळी ६ वाजता उदगीर शहरातील सराफा लाईन रोडवरील शंकरअप्पा मठ येथे उदगीर विश्र्व हिंदू परिषदद्वारा आयोजित गुरु पूजन व धर्मरक्षा निधी उत्सव कार्यक्रमास उपस्थित राहतील. सायंकाळी ७ वाजता उदगीर तालुक्यातील हेर येथील श्री पद्माकर कांबळे यांच्या निवासस्थानी सांत्वनपर भेट देतील. त्यानंतर सोयीनुसार उदगीर येथून लातूरकडे प्रयाण करतील व शकुंतला निवासस्थान येथे राखीव.

### माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी बाभळगाव निवासस्थानी विविध संस्था पदाधिकाऱ्यांसह नागरिकांच्या घेतल्या भेटी

लातूर प्रतिनिधी : राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक



कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी मंगळवार दि. ३० जुलै रोजी सकाळी बाभळगाव निवासस्थानी मराठवाड्यासह लातूर जिल्हाभरातून आलेल्या विविध संस्था पदाधिकाऱ्यांसह नागरिकांच्या भेटी घेऊन त्यांच्या अडीअडचणी समजून घेऊन निवेदनाचा व निमंत्रणाचा स्वीकार करून संबंधितांना पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी सूचना केल्या.

यावेळी माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे, विलास को–ऑपरेटिव्ह बँकेचे व्हा. चेअरमन समद पटेल, नांदेड काँग्रेसचे प्रा.यशपाल भिंगे, २१ शुगरचे व्हाईस चेअरमन विजय देशमुख, विलास सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन रवींद्र काळे, उदगीर तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष कल्याण पाटील, उदगीर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शिवाजीराव हुडे, जालना कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती गोपाळराव बोराडे, गणेश एस आर देशमुख, उपसभापती सुनील पडिले, माजी सभापती अजित माने, चंद्रशेखर दंडीमे, गोविंद डूरे पाटील, गोविंद बोराडे, अनंत बारबोले, गिरीश पाटील, निनाद भिंगे, सौहार्द भिंगे, श्रीहरी मुंदकर, पत्रकार राजकुमार दाभाडे, दगडूसाहेब पडीले, नईम शेख, हिंगोली कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक शामराव जगताप, दत्तराव भवर, सुनिता सोनकांबळे, सत्यभामा कासले, सलीम पठाण, नांदेड महानगरपालिकेचे माजी नगरसेवक विठ्ठल पाटील, सुभाष रायबोले, अब्दुल रशीद, सखाराम तुपेकर, संदीप सोनकांबळे, लक्ष्मण पाटील, प्रशांत सोनकांबळे, सतीश साळुंखे, भालचंद्र सोनकांबळे, मुन्ना शिंदे, आनंद मालू, संजय माने, अमर पवार, लक्ष्मीकांत पाटील, सदाम बागवान, संतोष नाईकवाडे, शोभा सोनकांबळे, आदीसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते.

आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.dainiklaturprabhat.in

# झरोका

एक – मी एक राजकीय वनवासी, मी एक राजकीय परदशी, आता मी काय करु अशी वलगणा मुख्यमंत्री शिंदे आणी उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार हे कसे काय भारुड गाऊन कावड पसरवू शकतात हेच कळत नाही. डोकं भरकटत चाललंय.

दुसरा – अरे, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे मूळ शिवसेनेतून फूटीर होवून मुख्यमंत्री बनले. राष्ट्रवादीचे अजित पवार हे शरद पवाराच्या तालमीत सक्षम राजकारणी, सत्ताकारणी बनले असले तरी ते पात्र की अपात्र या मुद्यावर शेवटची सूनावणी सर्वोच्च न्यायालय दिल्ली येथे होणार असल्याने आणी तशी नोटीस देवून खरे, खोटे काय ते विचारणा करुन तूम्हाला अपात्र का ठरवू नये अशी नोटीस सर्वोच्च न्यायालयाने दिल्याने हा सारा कलगीतूरा होताना दिसते आहे. त्यात नवल कसले.

एक – अहो, अजित पवार हे शरद पवार यांच्या तालमीत वावरलेले, एकनाथ शिंदे हे दिवंगत बाळासाहेब ठाकरे, आनंद दिघेयांच्या सावलीत उध्दव ठाकरे यांच्या बळावर मोठे झालेले असताना तेच आज वनवासी, परदशी वगैरे कसे काय शब्द वापरीत आहेत हेच कळत नाही म्हणून बोलतोय.

दुसरा – अरे, सत्ता, स्वार्थाचा घडा भरला की, अशीच अवकळा अवतरते आणी उद्याला काय उचित, अवचित, आश्चर्यात्मक काय घडणार आहे ते कळण्यापूर्वीच असे आभाळ कोसळते त्यावेळीच मी एक वनवासी, मी एक परदसी आता मी काय करु अशी आवळणी येते त्यास तेच जबाबदार असतात त्यात संदेह नसावा.

एक – अहो, मग नदीकाठच्या डबक्यातील पाणफुग्याला बुड, बुड घागरी म्हणून लेकरं खेळतात तसेच मतदार ही अशाना खेळवतील असेच तूम्हाला कळत न कळत म्हणायचे असेल. हेच समजावे काय ?

## काय बोलता राव ?

शेतकर, शेतमजूर, कामगार, कष्टकऱ्याना पैसे देण्यात येत नाहीत. पण प्राध्यापक, आमदाराना एक, दोन लाख रुपये दरमहा देता हे पैसे जनतेचेच आहेत त्याना नाहीत मग दुसऱ्याला कसे काय असे स्पष्ट करुन प्रहार संघटनेचे नेते आमदार बच्चू कडू यानी शासनालाच आव्हाण करुन प्रहारला २५ आमदार जनतेने द्यावेत मी आमदार, प्राध्यापकाचा पगार कमी करुन शेतकरी, शेतमजूर, कामगाराना देतो असे आ. बच्चू यानी कडू बोल सुनावले.

**काय बोलता राव,**

अरे, आमदार बच्चू कडू यांचे म्हणणे बरोबर आहे. आमदार काय करतात. जनतेच्या समस्या सोडवणे दुरच पण मतदार संघाचा विकास करीत नाहीत केवळ स्वार्थ बघतात. पण त्याना भरघोष पगार, भत्ते, सुविधा मिळतात मग शेतकरी, शेतमजूर, कामगाराना काय मिळते काम ना दाम घे धतूरा अशीच वेळ येते. त्यात प्राध्यापक महाशय शिक्षण ऐवजी राजकारण, अर्थकारणावर नजर ठेवून दिवसाकाठी ४०-४० मिनिटाचे दोन, तिन तास शिकवून की मुळीवर नजरा ठेवून दरमहा एक, दीड लाख रुपये कमवितात पण कामगार, बारा बलूतेदार उपासी मरतात म्हणूनच आमदार बच्चू कडू यांनी संताप व्यक्त करुन प्राध्यापक, आमदाराचे लाड करु, पूरवू नका, काम तसे दाम द्या अन्यथा मी आहेच असा कडू सल्ला आमदार बच्चू कडू यांनी दिला आहे. मग बोला दाजीबा !

## राजकारणातील सर्वात मोठी भेट, पंकजा मुंडे-प्रकाश आंबेडकरांच्या भेटीने नव्या राजकारणाची नांदी?

लातूर : वंचित आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर आणि भाजपच्या नवनिर्वाचित विधानपरिषद आमदार पंकजा मुंडे यांची भेट झाली. लातूरहून बीडकडे येत असताना प्रकाश आंबेडकर यांची पंकजा मुंडे यांनी घेतली भेट. प्रकाश आंबेडकर यांची आरक्षण बचाव यात्रा सुरु आहे. ही यात्रा लातूरवरून बीडमध्ये दाखल होत आहे. त्यादरम्यान पंकजा मुंडे यांनी प्रकाश आंबेडकर यांची भेट घेत त्यांचं स्वागत केलं.पंकजा मुंडे यांनी प्रकाश आंबेडकर यांची भेट घेतल्याने राजकीय वर्तुळामध्ये चर्चेला उधाण झाली.

# विधानसभा निवडणूकीसाठी !

## संपादकीय...

राजकीय पक्षाच्या अस्तित्वासाठी,खूर्ची, पदासाठी, सत्तेसाठी कोणता राजकीय पक्ष कोणत्या स्तरावर जाईल याचा नेम नसतो परंतू लोकशाही भारतातील महाराष्ट्र विधानसभा निवडणूकीच्या निमित्ताने सत्ता हस्तगत करण्यासाठी जी कांही निवडणूक रणनिती आखली जात आहे ती सर्वपक्षीय नेत्यानी करीत असलेल्या प्रचारकी थोतांडावरुन नकली यंत्रणा उघडी पडत असल्याचे दिसते आहे.

लोकसभा निवडणूकीत भाजपा, महायूतीचे महाप्रबंधक प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यानी विरोधी पक्षाना गिळंकृत करुन चारशेपारची घोषणा केली होती ती यशस्वी, अयशस्वी झाली किंवा न झाली ते मोदी, शहा, राजनाथसिंह यांच्या पेक्षा तमाम भारतीय मतदाराना जशी जाणीव झाली असेल तर त्यात नवल कसले अशी ही कुजबूज होताना दिसते आहे. ती चूकीची नसावी असे वाटते.

निवडणूक स्थानीक स्वराज्य संस्थेची असो की, विधानसभा, लोकसभा निवडणूकीची असो तित महागाई, भ्रष्टाचार, रोजगार, लाचखोरी, अन्याय, अत्याचार, सुशिक्षीत बेकाराचे प्रश्न सोडविणे, सर्वांगीण विकास साधणे, नागरी समस्यादूर करणे, नवनवीन प्रकल्प, योजना जाहीर करत आहेत त्या पूर्णत्वास नेवून नव्या प्रकल्प, योजनाना द्यावे यासाठी अग्रक्रम दिला पाहीजे परंतू मागचे आणि उद्याचा कृती, प्रक्रिया बाजूला ठेवून प्रगतशिल महाराष्ट्रात, भारताची आर्थीक राजधानी असलेल्या महाराष्ट्रात, फूले, शाहू, आंबेडकराच्या महाराष्ट्रात, छत्रपती शिवाजी महाराज, झांशीची राणी लक्ष्मीबाई, अहिल्यादेवी होळकर, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या कृतीशिल योगदानाचा विचार करणे गरजेचे असताना सत्तास्पर्धेत गुंतलेल्या राजकीय धेंडानी अशी कशी अवनता आली हेच कळत नाही अशीच उलटसूलट प्रतिक्रिया राजकीय वर्तूळात होताना दिसते आहे ती नाकारुन चालणार नाही असे म्हटल्यास वावगे ठरु नये असेच वाटते.

लोकसभा निवडणूकीत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यानी चारशेपारची घोषणा केली होती भाजपासह मित्रपक्षानी त्यासाठी प्रयत्न केले परंतू महाराष्ट्रातील सर्वपक्षीय राजकीय नेत्यानी आपापली ताकद सिध्द करणेसाठी जे कांही केले ते नुकसानच झाले त्यामूळे महाराष्ट्रातील सत्ताधारी, विरोधी पक्षाचे नेते, मंत्री, खासदार, आमदार, कार्यकर्ते कांहीच करु शकत नाहीत. विकासाचे प्रारुप, प्रकल्प, योजना काय आहेत त्या राष्ट्रीय स्वंयसेवक संघ, भाजपासह मित्रपक्षाचा नेत्यानाही ती माहीती नसेल तर विधानसभा निवडणूकीसाठी कांहीतरी आशादायी, विकसीत प्रकल्प, योजना आखूण, कार्यान्वीत करुन त्या जनतेसमोर मांडल्या, दाखविल्या, क्रियाशिल ठेवल्या तर भरपूर यश येवू पाहाते, वाटते हीबाब न्यायीक वाटते. परंतू विधानसभा निवडणूकीसाठी दिवंगत सावरकर यांचे नांव पूढे करुन मताचा जोगवा मागीत असल्याने तो कोणाच्या घशात, खिशात, घरात पोंहचेल अशीच कुजबूज सर्वपक्षीय स्तरावर होताना दिसते आहे ते टाळता येणे शक्य नसावे असे वाटते.

वास्तवीक पाहता विधानसभा निवडणूकीसाठी कामाची पावती, पूढे काय करणार हीच गॅरंटी असावी लागते परंतू भाजपा, मित्रपक्षाच्या महायूतीने विधानसभा निवडणूकीसाठी स्वातंत्र्यवीर वि.दा. सावरकर यांचा मुद्दा निवडला असल्याने विधानसभा निवडणूकी दरम्यान मेरे अंगणे मे तूम्हारा क्या काम आहे, अशीच लोकभावना व्यक्त होताना दिसते आहे ती न्यायीक वाटते. कारण असे की मनमानी कारभार, मनमानी निर्णय, बात, बाताची गरज नसतानाही प्रधानमंत्री नरेंद्र मोदीयानी मन की बात मधून महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे कौतूक करुन आगामी विधानसभा निवडणूकीसाठी प्रचार, प्रसारासाठी काय आणी कोणता मेनू, पर्याय स्विकारु याच कोड्यात जनता अडकले असल्याचे दिसते.

# निळ्या आकाशातील चमकणार लाल तारा. अण्णाभाऊ साठे हे मराठी नव्हते काय?

पृथ्वी ही शेषनागाच्या मस्तकावर तरली नसुन ती दलितांच्या,शोषितांच्या,कष्टकरी-कामगारांच्या तळहातावर तरलेली आहे...! अशा विज्ञानवादी दृष्टीकोनाचे पुरस्कर्ते, आपल्या अभ्यासपुर्ण पोवाडे व शाहिरीच्या माध्यमातुन प्रबोधन करत जगावर अधिराज्य गाजवणारे 'फकिरा'कार लोकशाहीर. साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे म्हणजे एक शब्दांच भांडार होते.आण्णाभाऊ साठे म्हणजे एक झंजावती विचार.आण्णाभाऊ साठेंच लिखाण म्हणजे उपेक्षीत-अपेक्षीतांचा एक आधार.अण्णाच्या हाती पेन आला तो एक तलवार होवुनच गोरगरीब-शोषित कामगार मजुराच्या खचलेल्या दबलेल्या लोकांचा आक्रोश,हळहळ,भुकेवर शब्द होवुन ही तलवार चालली.त्यांच्या लिखाणामुळे मुक्यांना वाचा आली.झोपलेल्यांना जाग आली.माझी मैना गावावर राहिली,माझ्या जीवाची होतीया काहिली हे कोण्या जाती धर्माला समोर ठेऊन लिहलेल काव्य नाही तर मुंबई पोट भरण्यासाठी आलेल्या तमाम चाकर मान्यची अंतकरणातील वेदना आहे.साहित्य सम्राट,लोकशाहिर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्य वाचकाना हार्दिक शुभेच्छा देऊ शकत नाही?. मराठी माणूस म्हणुन आण्णाभाऊ साठे यांना विनम्र अभिवादन! करू शकत नाही?.ही कोणती पत्रकारिता आहे जी जात पाहून मी मराठी माणूस ठरविते?.बहुसंख्य वृतपत्र अण्णाभाऊच्या जयंतीची साधी दखल घेत नाही. मुंबईतील सर्वाधिक खपाच्या दैनिकानी एक सिंगल कॉलम बातमी दिली असती तर काय फरक पडला असत?.याबदल वाईट वाटते म्हणूनच मी दरवर्षी हा पत्र प्रपंच करत असतो.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे नाव तुकाराम भाऊराव साठे आहे. हे एक मराठी समाजसुधारक, लोककवी आणि लेखक होते. त्यांचे लेखन सामाजिक आणि राजकीयदृष्ट्या कृतिशीलतेवर आधारलेले होते. ते मार्क्सवादी-आंबेडकरवादी विचारांचे होते. यांचा जन्म १ ऑगस्ट १९२० रोजी महाराष्ट्राच्या सांगली जिल्ह्यातील वाटेगाव येथे मांग जातीत झाला त्यांच्या वडिलांचे नाव भाऊराव आणि आईचे नाव वालबाई होते. जातीय भेदभावामुळे त्यांना शिक्षण घेता आले नाही. अण्णाभाऊंनी दोन विवाह केले. त्यांची पहिली पत्नी कोंडाबाई साठे आणि दुसरी पत्नी जयवंता साठे होत्या. त्यांना तीन अपत्ये होती. आज दि. १ ऑगस्ट लोकशाहीर,साहित्यरत्न तुकाराम भाऊराव साठे ऊर्फ अण्णाभाऊ साठे यांची जयंती ! अवघा दिड दिवस शाळेत जाऊन.ऐतिहासिक कथा, कांदबऱ्या,वगनाटय,पोवडेची रचना करून मराठी लोकसाहित्याची नवनिर्मिती करणारे.अण्णाभाऊ साठे महाराष्टातील मराठी माणूस नव्हते काय?.

भारतीय स्वातंत्र्य चळवळीसह संयुक्त महाराष्ट्र चळवळीत,तसेच गोवा मुक्ती संग्रामाच्या लढाईत त्यांनी जनजागृतीचे प्रचंड काम केले. एक कलाकार म्हणून आणि एक सर्वसामान्य कार्यकर्ता म्हणूनही ते प्रत्येक आंदोलनात सहभागी होत असत. चलेजाव चळवळीच्या काळात वटेगावातही बर्डे गुरुजींच्या नेतृत्वाखाली अनेक घडामोडी सुरू होत्या. अण्णाभाऊ त्यात सामील असल्याने त्यांच्यावर वॉरंट निघाले. परिणामी त्यांनी कायमचे घर सोडले. पुढे त्यांना तत्त्वज्ञानाची,विचारांची एक दिशा मिळत गेली आणि त्यांनी कम्युनिस्ट पक्षाचे पूर्णवेळ काम करायला सुरुवात केली. पक्ष कार्यासाठी झोकून दिलेले असतानाच १९४४ साली त्यांनी 'लाल बावटा' या कला पथकाची स्थापना केली. या वेळी शाहीर अमर शेख,शाहीर गव्हाणकर हे देखील त्यांच्या सोबत असत.लोकगायनातून लोकप्रबोधन करीत असताना त्यांनी त्यांच्या अनुभव लिहायला सुरुवात केली.आणि अजरामर साहित्य निर्माण झाले.लावण्या, पोवाडे,पथनाट्ये म्हणजे त्यांच्या ललित साहित्याची पूर्वतयारी होती. त्यांनी एकूण सुमारे १५ वगनाट्ये लिहिली व त्यातूनच त्यांना देशभर प्रसिद्धी मिळत गेली.असंघटीत समाजाला आपल्या शाहिरीतून जागृत करणारा लोकशाहीर साहित्य सम्राट अण्णभाऊ साठे म्हणजे निळ्या आकाशातील चमकता लाल तारा होता.

मुंबईत अण्णांच्या आयुष्याला १९४५ साली कलाटणी मिळाली.लोकयुद्ध साप्ताहिकात वार्ताहराचे काम करीत असताना त्यांनी अकलेची गोष्ट,खापर्या चोर, माझी मुंबई अशी गाजलेली लोकनाट्ये लिहिली.या काळातच संत साहित्यासह अनेक प्रतिभावंतांच्या अभिजात कलाकृती त्यांनी वाचून काढल्या.वैचारिक आणि कलाविषयक वाचनाची आवड असल्यामुळे त्यांना लेखन करायला खूप मेहनत करण्याची गरज पडली नाही. अण्णांभाऊचे लिखाण नेहमी कष्टकरी कामगार मजूर डोळ्या समोर ठेऊन होत होते.त्यातील नायक हा अन्याय अत्याचारा विरोध लढणार आणि जातीव्यवस्थे विरोधी बंड करून उठनाराच होता.त्याच्या प्रत्येक कथा, कांदबरया,वगनाट्य चा नायक हा सर्व सामान्य कुटुंबातून आलेला असल्यामुळे लोकांच्या,वाचकांच्या गळ्यातील ताईत बनत होता. भारत देश स्वतंत्र झाल्याच्या १९५० ते १९६२ साल म्हणजे अण्णभाऊच्या साहित्य क्षेत्रातील सुवर्णकाळ होता. याच काळात त्यांच्या पुस्तकांच्या अनेक आवृत्ती निघाल्या. प्रचंड यशस्वी होत असताना त्यांचे स्वत:चे जीवन मात्र धकाधकीचे होत गेले. मुंबई सरकारने 'लाल बावटा' या कला पथकावर बंदी घातली होती. पुढे तमाशावरही बंदी आली. त्यामुळे तमाशातील कलाकारांचे संसार देशोधडीला लागला. अण्णांभाऊनी तमाशाचे लोकनाट्यात रूपांतर करून तमाशा कलेचा उद्धार केला.तमाशाला लोकनाट्याचे वैभव मिळवून दिल्याने सरकारची बंदी कुचकामी ठरली.या सुवर्णकाळातच त्यांनी वैजयंता,माकडीचा माळ, चिखलातील कमळ,वारणेचा वाघ,फकिरा अशा अनेक कादंबऱ्या लिहिल्या. ३५ कांदबऱ्या लिहल्या त्यात ८ कांदबरीवर चित्रपट निर्माण झाले ते तुफान लोकप्रिय झाले १२ च्यावर कथासंग्रह लिहले त्यांनी स्टॅलिनग्राडचा पोवडा,महाराष्ट्राची परंपरा,मुंबईचा कामगार असे पोवाडेही लिहिले.निवडणुकीत घोटाळे,दुष्काळात तेरावाअकलेची गोष्ट ही त्यांची वगनाट्ये प्रसिद्ध आहेत. दोनशे-अडीचशे गाणी, लावण्या त्यांनी लिहिल्या आहेत. कामगारांमध्ये त्यांची गाणी आणि लावण्या लोकप्रिय आहेत.मराठीतील ग्रामीण,प्रादेशिक,दलित साहित्यावर अण्णा भाऊंचे प्रभुत्व होते. अण्णाभाऊंच्या साहित्याचे हिंदी,गुजराती,उडीया,बंगाली,तमीळ,मल्याळी अनेक भारतीय भाषांबरोबर रशियन,झेक,पोलिश, इंग्रजी,फ्रेंच अशा जगातील २७ भाषांमधे भाषांतर झाले आहे. लेखणीचे हत्यार बनवून त्यांनी पुरोगामी,विज्ञाननिष्ठ,स्त्रीवादी, लढाऊ अविष्काराचा दीपस्तंभ मराठी साहित्याच्या क्षेत्रात उभा केला. एवढ्या मोठ्या कर्तृत्वामुळे त्यांना प्रसिद्धी मिळत होती.

अण्णाभाऊ साठे जेव्हा मुंबईच्या 'माटुंगा लेबर कॅम्प' या दलित-शोषितांच्या वस्तीत कम्युनिस्ट चळवळीत कार्य करू लागले तेव्हा खर्या अर्थाने त्यांचे विचार क्रांतिकारक होऊ लागले. तत्कालीन लेबर कॅम्पमधील प्रमुख कम्युनिस्ट नेते,कार्यकर्ते आर.बी.मोरे, के.एम.साळवी,शंकर नारायण पगारे यांच्या सोबत ते कम्युनिस्ट पक्षाचे काम करू लागले. मार्क्सवादी विचारांच्या अभ्यासवर्गाला हजेरी लावू लागले. याच लेबर कॅम्पमध्ये ते पुन्हा धुळाक्षरे गिरवू लागले व लिहावयास लागले. त्यांनी पहिले गाणे लेबर कॅम्पमधील मच्छरावर लिहिले. याच लेबर कॅम्पमध्ये अण्णाभाऊ साठे,शाहीर अमर शेख व शाहीर द.ना.गव्हाणकर या त्रयींनी कम्युनिस्ट पक्षाच्या मार्गदर्शनाखाली लाल बावटा कलापथकाची १९४४ साली स्थापना केली आणि क्रांतिकारक शाहिरीचा बुलंद आवाज महाराष्ट्रभर नव्हे तर देशभर पसरला होता.

अण्णाभाऊच्या क्रांतिकारी विचारा पासुन मातंग समाज लांब आहे.उभे आयुष्य त्यांनी कम्यूनिस्ट चळवळीत घातले पण उच्च वर्णीय,वर्गीय नेतृत्व करणाऱ्या या डाव्या कामगार चळवळीने त्यांना मना पासून कधीच स्वीकारले नाही.शेवटी शेवटी अण्णाभाऊ नी भिमराव (बाबासाहेब) सांगितला पण त्यांच्या समाजाने आजही तो स्वीकारला नाही. विधान परिषद वर पहिला मातंग आमदार कॉग्रेस कोल्हापूरचे दशरथ नरसिंगा कांबळे यांना निवडून पाठविला आणि आता २०२४ ल भाजपने मातंग समाजाचा आमदार अमित गोरखे यांना निवडून पाठविले. म्हणजेच मातंग समाजाने कॉग्रेस,राष्ट्रवादी भाजपाचे नेतृत्व स्वीकारले पण आंबेडकरी विचारांचे नेतृत्व नाही. अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाच्या स्थापने पासुन इतिहास तपासला तर कोणाचा विकास झाला.हे दिसून येईल.महामंडळाच्या अध्यक्षाने जेलची हवा खाल्ली आहे.अनेक कार्यकर्ते त्याचं वाटेवर आहेत.ज्याने अण्णाभाऊ साठे यांच्या विचाराची चळवळ उभी केली पाहिजे होती,त्याने समाजाचे शोषण करणारी फळी उभी केली.आणि समाजाला विकलांग बनविले.अण्णाभाऊच्या जयंती दिनी व स्मुर्ती दिनी पूर्ण पण जाहिराती देवून राष्टवादीला मोठे केले.आणि मातंग समाजाच्या तरुणांना आकर्षित केले. समाजाचा विकास व कल्याण करण्यासाठी असलेल्या महामंडळाचा राजकीय अड्डा बनविला.अण्णाभाऊ साठे चा वैचारिक वारसा सांगणारा तरुण घडविन्या ऐवजी राष्टवादीचा मातंग कार्यकर्त्ता घडविला.त्यामुळे आज सर्वच राजकीय पक्षात मातंग आघाडी निर्माण झाली. त्यामुळे काही आमदार मंत्री झाले.त्यांनीच मातंग समाजाला आंबेडकरी चळवळी पासुन चार हात लांब राहण्याचा सतत मार्ग दाखवितात.आणि स्वतः च्या जातीपुरते वेगळे आरक्षण मांगतात त्याकरिता आता आंदोलन तीव्र करून ते कोणा विरोधात कोणासाठी लढतात हाच मोठा प्रश्र्न त्यांच्या व इतर समाजा समोर आहे.त्यामुळे खेड्या पाड्यातील मातंग समाज शोषण मुक्त झाला नाही.गावांत किंवा शहरातील आण्णाभाऊ साठे नगरातील तरुण शिक्षण,आरोग्य आणि रोजगार या पासुन वंचित आहे.तो मोठ्या प्रमाणात देव देवी,मरीआईच्या चक्रात अडकलेला असुन अज्ञान अंधश्रद्धा यातून तो मुक्त नाही.पुथ्वीशेष नागाच्या फण्यावर नसुन असंघटीत कष्टकरी कामगारांच्या तळ हातावर तरळी आहे.हे समाजच आज ही मान्य करीत नाही.म्हणुन अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्याचा अधिकार तो समाज गमावुन बसला आहे. त्यांच्या विचारांची जयंती जो पर्यन्त होत नाही तो प्रयन्त मातंग समाजाचा शैक्षणिक,सामाजिक,आर्थिक विकास होणार नाही.अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्य त्यांना कोटी कोटी प्रणाम!. सर्व वाचकाना हार्दिक शुभेच्छा !

**सागर रा तायडेभांडुप मुंबई,९९२०४०३८५९.**

# वडापाववर जगणारे जीव ! !

स्वारगेट पंढरपूर गाडीत अशा मोठ्या बॅगामध्ये आपला संसार घेऊन आलेले चार पाच कडके तरुण चढले. दरवेळी या मार्गाने निघाले की ४/५ लोक दिसतात असे. बहुतांश तरुण मुलं,पुरुष यूपी बिहारमधून आलेली असतात. त्यांचा कुणीतरी एखादा कॉन्ट्रॅक्टर असतो किंवा त्यांच्या आधी कुणीतरी त्यांच्या नात्यातील,गावातील मुंबई,पुणे किंवा इकडे आलेलं असतं.पूर्वी ही मंडळी मुंबई पुण्यातच दिसायची.आता ती ग्रामीण महाराष्ट्रात दिसू लागली आहेत.बहुसंख्य असंघटित बांधकाम कामगार,रंगकाम किंवा घरकाम व इतर तत्सम कामे करतात.यात मध्यप्रदेश,छत्तीसगढ,झारखंड कडचीपण मुलं असतात.यातले सर्वजण शहरात झोपडपट्टीत,अत्यंत कमी सुविधा असणाऱ्या, अस्वच्छ,अमानवीय जागेत राहतात.आयुष्यभर घाण वास मारणारे पब्लिक टॉयलेट वापरतात.गटाराच्यावर राहतात,यांची मुले गटारावर बसून टॉयलेट करतात.कुटुंब सोबत नसणारे एका एका खोलीत दाटीवाटीने झोपतात. लैंगिक दमन करवून घेतात पडेल ती कामे करतात. १००/५० रुपयांना मिळणारे शर्ट,पँट आनंदाने (?) घालतात. काहीजण एखाद्या प्लांटच्या आसपास राहतात.काम आणि मोबाईलवर आयुष्य सुरू असतं.व्हिडिओ कॉलवर घरातल्यांशी रोज बोलतात,नंतर एकट्याने रडतात. हाताने बनवून खातात.जास्ती वेळा दाळ भात,कधीतरी कालवण असतं.अतिशय कमी पोषणमुल्ये असलेलं खाऊन,प्रचंड अंग मेहनतीचं काम केल्यानं सतत आजारी असतात आणि प्रौढ होण्या आधीच ही तरुण मुलं म्हातारी होतात.

बाहेर कामाला जाणारे नाष्टा,जेवणा वेळीही वडापावच खातात,खाऊ शकतात.मुंबईत तर असे वडापाव खाऊन जगणारे अनेक जीव आहेत.जिभेला चव म्हणून वडापाव, समोसा खाणं आणि पोटाची आग शमविण्यासाठी खाणं वेगळंच की.रस्त्यावर




मिळणाऱ्या राईस प्लेटची किंमत विचारून झाल्यावर अन्नाला पाहून भुकेनं तोंडात आलेली लाळ गिळून पुन्हा वडापाव पाण्याच्या घोटाबरोबर खाऊन घेणारे अनेक जण असतात यात. बऱ्याचदा १२ तासाचे काम.सेठ (कॉन्ट्रॅक्टर) कडून मिळणारी, दिलेली अपमानास्पद वागणूक,घरच्या समस्या,सोबतीला असणारे व्यसनी लोक यांच्यामुळे बिडी,तंबाखू गुटखा,दारू हे जवळचे सोबती वाटू लागतात.

कुणाला जर वाटत असेल की क्रिकेट खेळणं हे देशप्रेम आहे आणि शासनाने त्यांना करोडो रुपये देण्यात काहीही वावगं नाही किंवा अंबानीकडं पैसे आहेत म्हणून तो पैसे खर्च करतो,त्यात काही गैर नाही त्यांनी एकदा या वडापाववर जगणाऱ्या जीवांसोबत बोलावं.कधीतरी रोजच्या जगण्यात बदल म्हणून झोपडपट्टीत वेळ घालवावा,मग लक्षात येईल आर्थिक विषमता आणि देशातील संपत्तीचे असमान वितरण म्हणजे काय ते!

झोपडपट्ट्या तोडल्या पाहिजेत, हे लोक बेकायदेशीर राहतात, असं म्हणून झोपडपट्ट्यातून नाकाला रुमाल बांधून जाणाऱ्या, रोज शॉवरशिवाय आंघोळ न करणाऱ्या आणि संडासात टॉयलेट पेपरशिवाय न जाणाऱ्या पांढरपेश्या लोकांनी एकदा झोपडपट्टीत जाऊन यांना अशा अमानवीय जागेत का राहावे वाटते? असा प्रश्र्न मनाला विचारून एक दिवस राहावे. मग उत्तर मिळेल की तिथे राहण्याशिवाय पर्याय नसतो म्हणून तिथे राहावे लागते. मॉलमध्ये महिन्याला हजारोंच्या बिस्कीट आणि चटकदार पदार्थांची खरेदी करणाऱ्यानी रोज बारा तास उभ्याने अंग मेहनतीचे काम करून वडापाववर दिवस काढून दाखवावा.

मऊशार गादीवर उबदार पांघरून घेऊन एसीशिवाय झोप न येणाऱ्यानी दहा बाय दहाच्या खोलीत आळीपाळीने झोपून बघावं.मग कळेल महाकाय बांधलेली मंदिरे लोकांची गरज नसून रोजगार आहे. मग लक्षात येईल शासनाकडून क्रिकेटर्सला दिल्या जाणाऱ्या २५ कोटीत किती जीव जेऊ शकले असते. आणि जस्टिन बिबरला दिले जाणारे ८२ कोटी कुणाच्या पोटावर पाय देऊन कमवलेले आणि कुणाच्या हिश्श्याचे आहेत! काही लोक आयुष्यभर काम करूनही पोट भरून खाऊ शकत नाहीत आणि काही लोक करोडो रुपये लग्नावर खर्च करतात. किती जीवघेणी तफावत आहे ही!

देशात जन्मणाऱ्या प्रत्येक नागरिकाला सन्मानाने जगता यावं असं आयुष्य देणं, सुविधा, रोजगार देणं ही पूर्णतः शासनाची जबाबदारी आहे.

ताक: यूपी बिहारमधून लोक महाराष्ट्रात येतात ही त्यांची चॉईस नाही,मजबूरी आहे. कुणाला असं स्वतःचं गाव,भावनिक मूळ,कुटुंब,प्रेमाची माणसं सोडून परक्या राज्यात, वेगळी भाषा,खानपान असणाऱ्या छोट्याशा गावात एखाद्या शेड किंवा गोडाऊनमध्ये जगायला आवडेल? असे जीव रोज देशातल्या अनेक राज्यात जातात.हे कसे जगले काय आणि कधी मेले कुणाच्याही लक्षात येत नाही. असं किडूकमिडूक,जीव जंतूसारखं दुर्लक्षित जगणं ही चॉईस कशी? सतत परप्रांतीय म्हणून केली जाणारी अवहेलना कुणाला हवी असणार?.

त्यांच्या गरिबीसाठी त्यांना जबाबदार न धरता त्यांचे राज्य शासन आणि केंद्र शासनाला खडे बोल सुनावले पाहिजेत. (त्यांच्या स्वतःच्या राज्यातच रोजगार निर्मिती न करणाऱ्या शासनाला उलथवून लावण्याची ताकद यांच्यात येवो!) ऊ लक्ष्मी यादव यांचा हा लेख बांधकाम कामगार ग्रुपवर मिळाला.प्रत्येक शहराचा विकास दिसतो.पण विकास करणारे माणसं दिसत नाही. अशा असंघटित बांधकाम नाका कामगारांसाठी १९८२ पासून मी काम करीत आलो. त्यासाठी कष्ट,त्याग करून जिद्द ठेऊन आणि बुद्धीचा वापर करून असंघटीतांना संघटित करून न्याय हक्क अधिकार मिळवून देण्यासाठी संघर्ष करीत आलो आहे.

**संकलन :- सागर रामभाऊ तायडे,भांडुप,मुंबई.**

## (गुरु वचन)
## दु:खावर विजय मिळवा

सिद्धार्थ नावाचा राजकुमार होता. त्याला जीवनात काहीच कमी नव्हते. तो सुंदर, सुदृढ व सद्गृहस्थ होता. त्याला कुठलेही शारीरिक किंवा मानसिक कष्ट नव्हते. त्याच्यापुढे सुख–समृद्धी हात जोडून उभी होती. त्याची पत्नी यशोधरा ही सुंदर, सुदृढ व पतीव्रता होती. त्याचा मुलगा राहुल सुद्धा मनमोहक व सुदृढ होता. सर्व काही होऊनही सिद्धार्थ दु:खाच्या अनुभूतीने पिडीत राहत होता.

खरं म्हणजे जन्मानंतर माणूस कुठल्यातरी शारीरिक किंवा मानसिक दु:खाने पिडीत असतो. दु:खांना पाहून व अनुभवूनच सिद्धार्थ बुद्धात रूपांतरित झाले. अभावावाचे कारण आपण अभावासच दु:खाचे कारण मानतो. जगातील बहुतेक श्रीमंत लोक दु:खी व असमाधानी आहेत. एखादी वस्तु किंवा व्यक्तीचा अभावच त्यांना दु:खी करतो. काही लोकांकडे पैशांची कमी नाही पण ते शारीरिक दु:खाने पिडीत आहेत.

काही लोक काम, क्रोध, ईर्ष्या, द्वेष, मोह सारख्या मानसिक दु:खांनी ग्रस्त असतात. तसेच काही लोक अज्ञानामुळे दु:खी आहेत. जर काही लोकांना दु:ख नसेल तर त्यांच्यासाठी जन्म–मृत्यूचे दु:खच काय कमी आहे? विजय म्हणजे लक्ष्य.जगात सुखाचे काही क्षण असतात. याचे प्रमाण आपणास लोकांचे हसणे, बोलणे, गाणे, खेळण्यात व आनंद साजरा करण्यात मिळू शकते. काही लोक थट्टा–मस्करी करताना दिसतात पण हे सर्व सुख क्षणभंगुर व तात्पुरते आहे. हा सर्व खटाटोप दु:खातून वाट काढण्याचा उपक्रम आहे. जर दु:खास जीवनाचा एक भाग मानले तर आपण याचाच विचार करून आपण आपले बहुमूल्य जीवन नष्ट केले पाहिजे? नाही, आपले लक्ष्य दु:खांवर विजय मिळवणे आहे. हाच आमचा पुरुषार्थ आहे. जगास दु:खालय मानून तडफडत मरणे मानवाचा लज्जास्पद पराभव आहे. त्याने जगास परीक्षा–स्थळ मानत दु:ख–सागरास ओलांडण्याचा उपाय शोधला पाहिजे. यामुळे त्यास सुख व शांतता लाभेल. जिथे रोग आहेत, तिथे उपचार आहे, जिथे अडचणी आहेत, तिथे त्यातून निघण्याचा मार्ग उपलब्ध आहे. फक्त आपल्या हृदयात खरी जिज्ञासा असण्याची गरज आहे. तसेच आपल्या लक्ष्याप्रती निष्ठावान व साहसी बनावे. विचारवंत मानतात की, मानवाची विषय तृष्णाच सर्व दु:खांचे मूळ आहे. जर ते तृष्णाच्या मृग–मरीचिकात फसण्यात स्वत:ला वाचवू शकले तर निश्चितपणे त्यांना कुठलेच दु:ख असणार नाही.

आपणास समोर जे दिसते, मनात तेच मिळण्याची इच्छा असते. जे आपल्याकडे आहे, त्यापेक्षा जास्त मिळवण्याची इच्छा करणेच तृष्णा आहे, जी कधीच पुर्ण होत नाही. जे आपल्याकडे आहे, त्यात समाधान मानून जर जास्तीत जास्त मिळवण्याची अनावश्यक इच्छा सोडली तर सर्व दु:ख टाळले जाऊ शकतात.

जगातील सर्व वस्त नश्वर आहेत. जर व्यक्तीने ही गोष्ट मनात आत्मसात केली तर जगातील कुठलेच दु:ख त्यास विचलित करु शकत नाही. भगवान बुद्धांनुसार, दु:ख निवृत्तीतून निर्वाणीत आहे. स्वत:ला राग–द्वेषातून मुक्त करणेच निर्वाण आहे, ज्यास थोड्या प्रयत्नातून मनुष्य आपल्या जीवनातच मिळू शकते.

# स्वयं प्रकाशित व्हा ही बुध्दाची शिकवण - भिक्खु पय्यानंद थेरो

लातूर : तथागत भगवान बुद्धानी समस्त मानवी जीवनाला उद्देशून मानव कल्याणकारी शिकवण दिली आहे. भगवान बुध्द यांनी मानवाच्या कल्याणासाठीच सर्व स्तरावरील उपदेश दिले आहेत. मनुष्य व त्याचे मन जीवनातील मुख्य अंग आहेत. मनुष्याचे मन अत्यंत प्रगल्भ, वैचारिक, बौद्धिक स्तरावर विवेकी असणे गरजेचे आहे. मनुष्याचे ज्ञान हे परावलंबी न होता ते स्वकर्तुत्वाने स्वावलंबी असणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे मनुष्याने स्वकर्तुत्वाने ज्ञान मिळवले पाहिजे. या करिता भगवान बुद्ध यांनी अत्त: दीप भव अर्थात स्वयंप्रकाशित व्हा असा मौलिक उपदेश त्यांनी समस्त समाजाला दिला असे प्रतिपादन पू. भिक्खु पय्यानंद थेरो यांनी केले.

दर रविवार, चलो बुद्ध विहार अभियानांतर्गत कुशिनारा बुद्ध विहार, म्हाडा कॉलनी, बाभळगाव रोड, लातूर येथे सामूहिक बुद्ध वंदनेचे आयोजन करण्यात आलेले होते.

प्रारंभी सर्व उपस्थित उपासक उपासिका यांच्या हस्ते तथागत भगवान बुद्ध व बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पुष्पाने, धुपाने, दिपाने पूजा झाली. त्यानंतर त्रिसरण पंचशील ग्रहण करून सामूहिक बुद्ध वंदना करण्यात आली. यावेळी बावीस प्रतिज्ञा, भारतीय संविधानाचे प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन देखील करण्यात आले.




पुढे बोलताना भिक्खु पय्यानंद थेरो म्हणाले कि, मनुष्याने इतरांच्या बाबतीमध्ये आपले ज्ञान न व्यक्त करता केवळ आत्मज्ञान करून घेण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे. आत्मज्ञान हे मनुष्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी उपयुक्त आहे. स्वचिंतनाने मनुष्य योग्य–अयोग्य, सत्य–असत्य, चांगले–वाईट, ज्ञान–अज्ञान, लाभ–हानी अशा सर्वच गोष्टींची जाणीव करू शकतो. त्यामुळे मनुष्याने आत्मज्ञान व आत्मभान या दोन्ही गोष्टीची सिद्धता करणे महत्त्वाचे आहे, असेही ते धम्मदेसनेत म्हणाले.

यावेळी सुनीता कसादे, बबीता कांबळे, शिलाताई ससाने, करुणा ताई कांबळे, सुरेखा कांबळे, शकुंतला बटनपुरकर, सरिता हरणे, कस्तुराबाई सुर्यवंशी, सत्यकला मोरे, नैना कांबळे, कांचन कांबळे, आम्रपाली सुर्यवंशी, कविता भालेराव, मनिषा वाघमारे, पंचशीला बनसोडे, अंजली सोनकांबळे, निर्मला थोटे, कांता काकडे, शामल कांबळे, सुमन उडानशिव, सरिता बनसोडे, दिलिप हरणे, उत्तम कसादे, विजय कांबळे, गौतम गायकवाड, सुर्यकांत कालेकर, राजाराम बटनपुरकर, प्राचार्य प्रशांत भोपणीकर, भानुदास कांबळे, राहुल सुर्यवंशी, संजय भालेराव, अर्जुन वाघमारे, ज्योतीराम लामतुरे, करन ओव्हाळ, सुधाकर कांबळे, अशोक कांबळे, चंद्रसेन भडके, अनिरुद्ध बनसोडे, ई. सह मोठ्या संख्येने बौद्धउपासक उपासिकांची उपस्थिती होती.

यावेळी प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मिलिंद धावारे यांनी केले तर आभार दयानंद बटनपुरकर यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतीसाठी महाविहार धम्म सेवक ग्रुपच्या सर्व सदस्यांनी प्रयत्न केले.

# साहित्य सम्राट आण्णाभाऊ साठे जयंती उत्सव निमित्त गुरुवार दि.०१.०८.२०२४ रोजी लातुर शहरातील वाहतूक मार्गात बदल...

लातूर/प्रतिनिधी : प्रतीवर्षाप्रमाणे साहित्य सम्राट आण्णाभाऊ साठे जयंती उत्सव निमित्त लातुर शहरात दिनांक ०१/०८/२०२४ रोजी जयंती उत्सव मोठया प्रमाणात साजरा होणार असून विविध जयंती समिती व संघटनेतर्फे वाजत गाजत मिरवणुका काढतसाहित्य सम्राट आण्णाभाऊ साठे चौक,लातूर येथे मोठ्या संख्येने जनसमुदाय येतो व साहित्य सम्राट आण्णाभाऊ साठे यांचे पुतळयास मानवंदनेच्या वेळी रस्त्यावर दुतर्फा गर्दी होते. त्यामुळे जनतेच्या सोईच्या व सुरक्षिततेच्या दृष्टीने लातूर शहरातील खालील मार्गावर वाहतुक बंद करणे व वाहतुक वळविणे आवश्यक आहे.

साहित्य सम्राट आण्णाभाऊ साठे जयंती निमित्ताने दिनांक ०१/०८/२०२४ रोजी मिरवणुका या पी.व्ही.आर चौक ते एक नंबर कॉर्नर, पाण्याची टाकी(संविधान चौक), दयानंद गेट, छत्रपती शिवाजी महाराज चौक, अशोक हॉटेल,महात्मा गांधी चौक,गंजगोलाईमार्गे साहीत्य सम्राट अण्णाभाऊ साठे चौक व जुना रेणापूर नाका मार्गे छत्रपती शिवाजी महाराज चौक, अशोक हॉटेल,महात्मा गांधी चौक,गंजगोलाईमार्गे साहीत्य सम्राट अण्णाभाऊ साठे चौक व तसेच गरुड चौक ते गाव भागातील मिरवणुका विवेकानंद चौक,डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक,शाहू चौक मार्गे साहीत्य सम्राट अण्णाभाऊ साठे चौक येथे येणार आहेत. त्यामुळे दिनांक ०१/०८/२०२४ रोजी दुपारी १३.०० ते रात्री २३.०० वाजे पर्यंत सदरचे रोड हे सर्व प्रकारच्या वाहनांना (मोटार सायकल, थ्री व्हीलर, एस.टी.बसेस, ट्रक, टॅम्पो, टॅक्सी, ट्रॅव्हल्स, मिनीडोअर इ.) वाहतुकीसाठी बंद करण्यात यावेत.

तरी जनतेने खालील पर्यायी मार्गाचा अवलंब करावा.

१) पी.व्ही.आर चौकातुन शिवाजी चौक व शहरात येणारे एस.टी.बसेस पी.व्ही.आर.चौकातुन रिंगरोडने नवीन रेणापुर नाका मार्गे जुना रेणापुर नाका येथिल बसस्टॅन्डचा वापर करतील.बाकी सर्व वाहने रेणापूर नाकाकडे किंवा खाडगाव टी पॉईट मार्गे वाडा हॉटेल किंवा खाडगाव टी पॉईंट, साई धाम, आशियाना बंगला, जुना औसा रोड याचा वापर करतील.

२) औसा रोडने शहरात येणाया एस.टी.बसेस या छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील बसडेपोचा वापर करतील. तसेच चार चाकी,तीन चाकी व दोन चाकी वाहने जुना औसा रोडवरुन आशियाना बंगला, साई धाम मार्गे खाडगाव टी पॉईंट किंवा नाईक चौक मार्गे सुतमील रोड या मार्गाचा वापर करतील.

३) अंबाजोगाई रोडने लातूर शहरात येणाया एस.टी.बसेस जुना रेणापुर नाका येथिल बसस्थानकाचाच वापर करतील.अंबाजोगाई रोडने येणारी चार चाकी, तीन चाकी व दोन चाकी वाहने ही सिध्देश्र्वर मंदिराकडील रोड मार्गे गरुड चौकाकडे किंवा गाव भागात जातील व तसेच जुना रेणापुर नाका येथून बालाजी मंदीर या मार्गाचा वापर करतील.

४) नांदेड रोडने शहरात येणाया एस.टी.बसेस या गरुड चौक .सिद्धेश्र्वर चौक,नविन रेणापुर नाका मार्गे जुना रेणापुर नाका येथिल बसस्थानकाचा वापर करतील. नांदेड रोडने येणारे ट्रक, चार चाकी, तीन चाकी व दोन चाकी वाहने ही सिध्देश्र्वर मंदिराकडील रोड मार्गे नविन रेणापूर नाका, रेल्वे स्टेशन मार्गे पीव्हिआर चौक या मार्गाचा वापर करतील किंवा गरुड चौक, बाभळगाव नाका, बश्र्वेवश्र्वर चौक मार्गे राजीव गांधी चौक या मार्गाचा वापर करतील.

५) तसेच शहरातील वाहतुकीसाठी जनतेस १) राजस्थान विद्यालय ते पॅरलल रोडने बेद्रे कॉम्पलेक्सच्या पाठीमागून औसा रोड, आशियाना बंगला – खाडगाव रोड ते रिंगरोडचा २) गांधी चौक ते बस्वेश्र्वर महाविद्यालय – रमा चित्रपटगृह – खोरी गल्ली – शिवनेरी लॉज अशा मार्गाचाच अवलंब करावा. जुना रेणापुर नाका बसस्थानक येथे येणा–या व जाणा–या सर्व बसेस परत त्याच मार्गे रिंग रोडने जातील.

तरी सर्व नागरिकांनी दि. ०१/०८/२०२४ रोजी सकाळी दुपारी १३.०० ते रात्री २३.०० वाजेपर्यंत वाहतुकीसाठी बंद असलेल्या मार्गावर वाहनांचा वापर टाळावा व पर्यायी मार्गाचा वापर करुन प्रशासनास सहकार्य करावे.

# अशक्तपणा आणि थकवापासून आराम मिळेल; दररोज फक्त 'ही' ३ जीवनसत्त्वे घ्या!

दिवसभर सतत काम केल्यानंतर शरीरात थकवा जाणवणं ही स्वाभाविक गोष्ट आहे. पण, जर तुम्हाला दिवसभरात वारंवार थकवा जाणवत असेल तर मात्र, ही गंभीर समस्या आहे. सतत थकवा आणि अशक्त वाटणे किंवा झोपल्यानंतरही झोप न लागणे हे शरीरातील अनेक प्रकारचे जीवनसत्त्व कमी होत असल्याचे लक्षण आहे. तुम्हाला जर असे वारंवार होत असेल तर तज्ज्ञांचा सल्ला घ्या असं आरोग्य तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

कोणत्याही शारीरिक प्रयत्नाशिवाय किंवा अशक्तपणाशिवाय हे घडणे सामान्य मानले जात नाही. अनेक वेळा केवळ शारीरिकच नाही तर मानसिक तणावामुळेही शरीर थकते. त्यामुळे तुमच्या कामाच्या क्षमतेवरही परिणाम होतो. शारीरिक आणि मानसिक थकवा दूर करण्यासाठी आहारात कोणत्या जीवनसत्त्वांचा समावेश करावा? या संदर्भात अधिक माहिती जाणून घेऊयात.

व्हिटॅमिन डी

शरीरात व्हिटॅमिन डीच्या कमतरतेमुळे अनेक आरोग्य समस्या उद्भवू शकतात. त्याची कमतरता शरीर आणि मन दोन्हीच्या कार्यक्षमतेवर परिणाम



करते. थकवा, अशक्तपणा आणि शरीर दुखणे ही या जीवनसत्त्वाच्या कमतरतेची लक्षणे आहेत. याच्या कमतरतेमुळे झोप पूर्ण झाल्यानंतरही जडपणा किंवा झोप येण्याची समस्या उद्भवते. संत्र्याचा रस, गाईचे दूध आणि दही हे व्हिटॅमिन डीचे उत्कृष्ट स्त्रोत आहेत.

व्हिटॅमिन सी

व्हिटॅमिन सी च्या कमतरतेमुळे आपल्या शरीराला नेहमीच आजारांनी घेरलेले असते. हे जीवनसत्व शरीरात रोगप्रतिकार शक्ती वाढविण्याचे काम करते. याच्या कमतरतेमुळे शरीराची रोगांशी लढण्याची क्षमता कमी होते. शरीराची प्रतिकारशक्ती कमी असल्याने शरीरात थकवा आणि अशक्तपणा राहतो. त्वचा आणि केस निर्जीव दिसू शकतात. अशा वेळी मोसंबी, आवळा, लिंबू, किवी, अननस, स्ट्रॉबेरी, संत्री आणि आंबा खा. यामध्ये व्हिटॅमिन सी भरपूर प्रमाणात असते.

व्हिटॅमिन बी १२

व्हिटॅमिन बी १२ आपल्या शरीरासाठी खूप गरजेचं आहे. शरीरातील रक्तपेशी आणि डीएनए तयार करण्यासाठी व्हिटॅमिन बी१२ आवश्यक असते. व्हिटॅमिन बी १२ च्या कमतरतेमुळे देखील नैराश्य येते. व्हिटॅमिन बी १२ चेतासंस्थेसाठी देखील आवश्यक आहे. व्हिटॅमिन बी १२ च्या कमतरतेमुळे तुम्हाला अस्वस्थ वाटू शकते. व्हिटॅमिन बी १२ ची कमतरता भरून काढण्यासाठी तुम्ही आहारात मासे, अंडी, संपूर्ण धान्य आणि मांस यांचा समावेश करू शकता.

# डायबिटीज असताना स्मोकिंग करता का? हार्ट आणि किडनीवर हा गंभीर परिणाम

आज प्रत्येक जण आरोग्याच्याबाबतीत सर्तक असतो. मात्र, असे असताना काही निष्काळजीपणा आजाराला निमंत्रण देतो. तुम्ही डायबिटीजचे रुग्ण असाल तर विशेष काळजी घ्यावी लागते. नाहीतर त्यांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ शकतात. डायबिटीज असताना तुम्ही स्मोकिंग केले तर त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागतात. डायबिटीजला 'क्रोनिक डिसीज' असेही म्हटले जाते. तेव्हा डायबिटीजच्या रुग्णांनी स्मोकिंग करणे खूप धोकादायक आहे. तुम्ही कोणत्या समस्येला सामोरे जाऊ शकता, ते जाणून घ्या.



शुगर पातळी वाढण्यास मदत

डायबिटीजच्या रुग्णांनी स्मोकिंग केल्याने तुमच्या शरिरातील शुगर पातळी वाढण्यास मदत होते. अशा वेळी डायबिटीजला कंट्रोल करणे खूप कठीण होते. तुम्हीही डायबिटीजचे रुग्ण असाल आणि स्मोकिंग करत असाल तर तुम्हाला त्याचे गंभीर परिणाम होऊ शकतात. त्यामुळे डायबिटीज असणाऱ्या लोकांनी स्मोकिंग करु नये.

स्मोकिंग केल्याने हे आजार बळवतात

– स्मोकिंग केल्याने तुमच्या आतड्यावर परिणाम होते. डायबिटीजच्या लोकांना आतड्याचा त्रास जाणवतो. स्मोकिंग केल्याने डायबिटीजच्या रुग्णांच्या आतड्यांमध्ये जठरतात येते.

– डायबिटीजच्या रुग्णांनी स्मोकिंग करणे हे दुसऱ्या रोगाला आमंत्रण देणे आहे. हार्ट रुग्णांनी स्मोकिंग करणे टाळावे. ज्या लोकांना डायबिटीज आहे त्यांनी स्मोकिंग किंवा तंबाखू यांसारख्या घातक गोष्टींचे सेवन केल्यास हृदयसंबंधित आजारांचा बळवतो.

– डायबिटीज असणाऱ्यांनी स्मोकिंग केल्याने याचा परिणाम हा किडनीवरही होतो. किडनीसंबंधित आजार डोकेवर काढतात. स्मोकिंग केल्याने किडनीसंबंधित आजार वाढून त्याचा तुमच्या डोळ्यांवरही परिणाम होतो. त्यामुळे डायबिटीजच्या लोकांनी स्मोकिंग करताना दहावेळा विचार करावा.

– डायबिटीज रुग्णांनी स्मोकिंग केल्याने शुगर पातळी कमी होते. ग्लुकोज लेव्हल कमी जास्त झाल्यामुळे तुम्ही खाली पडू शकता किंवा चक्करही येऊ शकते. त्यामुळे वेळीच सावधान व्हा. जेव्हा तुम्ही डायबिटीजअ सताना स्मोकिंग करता तेव्हा तुमच्या शरीरातील ग्लुकोजचं प्रमाण कमी जास्त होत असते.

– डायबिटीजच्या लोकांनी स्मोकिंग केल्याने ऐल्ब्युमिनमेहात यूरिनमध्ये आणखी वाढते. त्यामुळे वाढतो. टाइप २ डायबिटीज – स्मोकिंग करणाऱ्यांमध्ये इतरांच्या तुलनेत टाइप–२ डायबिटीजचा धोका वाढतो

# न फनकार तुझसा, तेरे बाद आया, मोहम्मद रफी तू बहोत याद आया.....

आज ३१ जुलै, चार दशकांहून अधिक काळ आपल्या सुमधुर आवाजाने रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारे महान गायक, सूरसम्राट मोहम्मद रफी यांचा स्मृती दिन. मोहम्मद रफी यांचा जन्म २४ डिसेंबर १९२४ ला पंजाब राज्यातील कोटला सुल्तानसिंह या गावात झाला. मोहम्मद रफी यांना लहानपणापासूनच गायनाची आवड होती. मोहम्मद रफी १४ वर्षाचे असताना त्यांचे कुटुंब लाहोरला स्थलांतरित झाले. तिथेच त्यांनी शास्त्रीय संगीतातील दिग्गज गायक उस्ताद बडे गुलाम अली, उस्ताद अब्दुल खान, पंडित जीवनलाल मट्टू आणि फिरोज निजामी या महान शास्त्रीय गायकांकडे संगीताचे धडे गिरवले. पंजाबी चित्रपट गुल बलोच पासून त्यांनी चित्रपट गायनाला सुरवात केली.

या चित्रपटातील त्यांच्या आवाजातील गाणी लोकप्रिय झाली. त्यांच्या आवाजाने प्रभावित होऊन फिरोज निजामी यांनी त्यांना लाहोर रेडिओला नोकरीला लावले. ते रेडिओवर गाणी म्हणू लागली. रेडिओवरील त्यांची गाणी ऐकून जे. बी. वाडिया यांनी त्यांना आपल्या बाजार या चित्रपटासाठी पार्श्र्वगायन करण्याची विनंती केली ती मोहम्मद रफी यांनी मान्य केली. या चित्रपटातील सातही गाणी मोहम्मद रफी यांनीच गायली. ती सर्व गाणी लोकप्रिय झाली. त्याकाळातील लोकप्रिय संगीतकार नौशाद यांनी त्यांना अनेक चित्रपटात संधी दिल्या. पुढे या जोडीने हिंदी चित्रपट सृष्टीवर अधिराज्य गाजवले. संगीतकार नौशाद आणि गायक मोहम्मद रफी म्हणजे चित्रपट सुपरहिट असे समीकरणच बनले. मोहमद रफी यांच्या आवाजाने नौशाद यांच्यावर अक्षरशः मोहिनी घातली होती.

५० च्या दशकात नौशाद रफी साहेबांव्यतिरिक्त कोणत्याही गायकासोबत काम करत नव्हते. या दोघांनी लोकप्रिय संगीताचा वापर करून चित्रपट सृष्टीतील गीतांचे आयामच बदलून टाकले. बैजू बावरा, उडण खटोला, कोहिनूर, मेरे मेहबूब, दिल लिया दर्द दिया, संघर्ष या लोकप्रिय झालेल्या चित्रपटांचे संगीतकार नौशाद आणि गायक मोहम्मद रफी ही जोडी प्रसिद्ध होती. ओ.पी. नय्यर, सचिन देव बर्मन, शंकर जयकिशन, मदन मोहन, रोशन या संगीतकरांचेही मोहम्मद रफी हे आवडते गायक होते. या संगीतकरांनी दिलेले संगीत आणि मोहम्मद रफी यांनी गायलेली सर्व गाणी लोकप्रिय झाली. १९५० ते १९८० असा सुमारे ४ दशकांचा काळ मोहम्मद रफी यांनी अक्षरशः गाजवला. गुरुदत्त, दिलीपकुमार, राजकपूर, देवानंद, शम्मी कपूर, शशी कपूर, राजेंद्र कुमार, सुनील दत्त, राजकुमार, राजेश खन्ना, अमिताभ बच्चन, धर्मेंद्र, जितेंद्र, विनोद खन्ना, ऋषी कपूर अशा सर्व नायकांना त्यांनी आवाज दिला. या सर्व नायकांना महानायक करण्याचे काम मोहम्मद रफी यांच्या आवाजाने केले. मोहम्मद रफी यांच्या आवाजाने तरुणाईला वेड लावले होते. त्यांची सर्व गाणी इतकी लोकप्रिय झाली की ती आजही गायली जातात, ऐकली जातात. मोहम्मद रफी यांनी सर्व प्रकारची गाणी गायली. केवळ हिंदीतच नाही तर उर्दू, पंजाबी, मराठी, तेलगू या भाषांमध्येही त्यांनी गाणी गायली. त्यांची गाणी केवळ भारतातच नव्हे तर जगभर लोकप्रिय झाली. मोहम्मद रफी यांना गायनासाठी सहा वेळा फिल्मफेअरचा पुरस्कार मिळाला.

भारत सरकारनेही पद्मश्री हा मानाचा पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला. भारत सरकारने त्यांच्या स्मरणार्थ त्यांच्या नावाचा स्टॅम्पही तयार केला आहे. ३१ जुलै १९८० ला रात्री १० वाजून ५० मिनिटांनी मोहम्मद रफी यांनी जगाचा निरोप घेतला. मोहम्मद रफी यांच्या अंत्ययात्रेत दहा हजारांहून अधिक चाहते उपस्थित होते. २०१३ मध्ये भारतीय हिंदी सिनेमाला १०० वर्ष पूर्ण झाली त्यानिमित्ताने बिबीसी एशिया नेटवर्कने एक सर्व्हे केला. त्यात मोहम्मद रफी हेच हिंदी चित्रपट सृष्टीतील महान गायक म्हणून नावाजले गेले. मोहम्मद रफी हे केवळ गायक म्हणूनच नाही तर व्यक्ती म्हणूनही महान होते. मोहम्मद रफी नेहमीच दुसऱ्यांना मदत करण्यात पुढे असत. त्यांनी काही संगीतकारांसाठी फुकट गाणीही गायली आहेत.

रॉयल्टी साठी त्यांनी कधी कोणाला अडवले नाही. त्यांच्या विषयी लता मंगेशकर म्हणतात, मधुर स्वभावाचा सुरीला माणूस. माझे भाग्य आहे की माझी बहुतेक गाणी मी त्यांच्यासोबत गायली आहेत. संगीत न समजणाऱ्या लोकानांही त्यांनी कानसेन बनवले. त्यांच्या निधनानंतर त्यांच्या सन्मानार्थ आनंद बक्षी यांनी लिहिले होते की, न फनकार तुझसा, तेरे बाद आया, मोहम्मद रफी तू बहोत याद आया.....

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे ९९२२५४६२९५**

# विवेकानंद रुग्णालयात क्लिष्ट हृदय शस्त्रक्रिया यशस्वी

लातूर : येथील विवेकानंद रुग्णालयात आणखी एका रुग्णावर क्लिष्ट हृदय शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पार पडली आहे. विवेकानंद रुग्णालयात मागील दोन वर्षांमध्ये गंभीर, जन्मजात हृदय विकृतींसाठी शेकडो यशस्वी हृदय शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत. या सर्व हृदय शस्त्रक्रिया समाजहितैषी दात्यांच्या सहकार्यामुळे व विविध योजनांतर्गत विनामूल्य करणे रुग्णालयाला शक्य झाले आहे. या अंतर्गतच जून २०२४ महिन्यातील हृदय शस्त्रक्रिया शिबिरात एक १९ वर्षीय स्त्री रुग्ण दाखल झाली. तिला, तडऊ (Ventricular Septal Defect) व ऊउठत (Double Chambered Right Ventricle) या जन्मजात हृदय विकृती होत्या. तडऊ मध्ये हृदयाच्या डाव्या व उजव्या निलयामध्ये छिद्र असल्याकारणाने दोन्ही निलयातील रक्त एकत्र मिसळते. परिणामी हृदयाची कार्यक्षमता कमी होते, तसेच ऊउठत मध्ये उजव्या निलयामध्ये उच्च दाब व कमी दाव असे दोन भाग तयार होतात. या हृदय विकृतीसाठी VSD Repair (Closure) व DCRV Repair ही शस्त्रक्रिया केली जाते. तर वर उल्लेख केलेल्या रुग्णास भूक न लागणे, वजनात वाढ न होणे, क्रियाशक्ती कमी असणे अशी लक्षणे दिसत होती. ही रुग्ण यापूर्वी उपचारासाठी २ – ३ रुग्णालयात गेली होती. परंतु शस्त्रक्रियेसाठी लागणारा खर्च परवडत नसल्याकारणाने (कुटुंबामध्ये आई एकटी आहे) रुग्णाने शस्त्रक्रिया टाळली. विवेकानंद रुग्णालयात होणाऱ्या मोफत हृदय शस्त्रक्रिया शिबिराची माहिती मिळताच रुग्ण उपचारासाठी दाखल झाली. तिच्या आवश्यक पूर्व तपासण्या केल्यानंतर तडऊ उश्रीीश ही शस्त्रक्रिया यशस्वीरित्या रुग्णावर करण्यात आली. दोन गंभीर स्वरुपाच्या हृदय विकृतीमुळे शस्त्रक्रिया अतिशय क्लिष्ट होती. तरीही सदर शस्त्रक्रिया डॉक्टरांनी कुठल्याही गुंतागुंतीशिवाय पार पाडली. शस्त्रक्रियेदरम्यान रुग्णाची प्रकृती स्थिर होती.

शस्त्रक्रियेनंतरही रुग्णामध्ये समाधानकारक सुधारणा होत राहिली. एक आठवड्यानंतर रुग्णास सुट्टी करण्यात आली. आज एक महिन्यानंतर रुग्णाची प्रकृती उत्तम आहे. सदर रुग्णाच्या आईने 'माझ्या गंभीर हृदय विकृतीने ग्रस्त असणाऱ्या मुलीवर मोफत हृदय शस्त्रक्रिया करुन बरे केले ही आम्हाला खूप मोठी मदत झाली' असे भावपूर्ण उद्गार काढले. तसेच मुंबईसारख्या मोठ्या शहरांमध्ये जाऊन ऑपरेशन करण्याचा पर्याय आम्हाला सुचवला गेला होता. परंतु विवेकानंद रुग्णालयावर आमचा विश्र्वास असल्यामुळे येथे आलो. डॉक्टर व संपूर्ण टिम, रुग्णालय प्रशासन यांच्या सहकार्याबद्दल आभार मानले. या रुग्णावर यशस्वी हृदय शस्त्रक्रिया डॉ. सारंग गायकवाड हृदय शल्यचिकित्सक (मुंबई), डॉ. नितीन येळीकर हृदयरोग तज्ज्ञ (लातूर) व त्यांची टिम डॉ. प्रविण लोहाळे (भूलतज्ञ), डॉ. प्रमोद तोष्णीवाल (बालरोग तज्ञ), डॉ. चंद्रशेखर औरंगाबादकर (अतिदक्षता विभाग तज्ञ), निवासी वैद्यकीय अधिकारी व नर्सिंग स्टाफ व चमूने पार पाडली.

